# सेंद्रीय शेती – यशाची पंचसूत्री


## महाराष्ट्र ऑरगॅनिक फार्मिंग फेडरेशन, पुणे (मॉफ)

१०३८/११, बालाजी निवास, फ्लॅट नं. ५, कॉसमॉस बँक लेन,

दीप बंगला चौक, मॉडेल कॉलनी, पुणे – ४११ ०१६

फोन नं. (०२०) २५६५९०९० / ३२९०७३०२

Email :- moffpune@gmail.com,

Website :- www.moffindia.com , www.moffindia.org

**आणि**

## ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया

जी–८ , ब्रिटोज अपार्टमेंट, नवीन म्हापसा क्लीनिक जवळ

म्हापसा – ४०३ ५०७ , गोवा (इंडिया )

फोन नं. (०८३२) २२५५९१३

**Email** :- myofai@gmail.com, **Website :-** www.ofai.org

## १. राज्यस्तरीय सेंद्रीय शेती संस्था :-

- **शेतकरी**
- **व्यापारी**
- **निसर्ग प्रेमी**
- **स्वयंसेवी संस्था**
- **ग्राहक**

# सेंद्रीय शेती – यशाची पंचसूत्री


| अ.क्र | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | मॉफची उद्दिष्टे, सहकारी, संरचना, प्रमुख उपक्रम | ४ |
| २ | सेंद्रीय शेती व अन्नसेवन कशासाठी ? | १५ |
| ३ | सेंद्रीय शेती – यशाची पंचसूत्री | १६ |
| | पंचसूत्री १ : – देशी गाय | १८ |
| | – गोमये वसते लक्ष्मी | १९ |
| | – देशी गाय व संकरीत गाय तुलनात्मक अभ्यास | २० |
| | – गाईपासून मिळणा–या सेंद्रीय निविष्ठा | २१ |
| ४ | पंचसूत्री २ :– ॲरोग्रीनचा वापर | २६ |
| ५ | पंचसूत्री ३ : – पिकाचे योग्य वाण व मिश्रपीक पेरणी | ३२ |
| | – पिकांचे योग्य वाण (६३ पिके) | ३३ |
| | – मिश्र पीक पेरणी | ४० |
| | – आंतरपीक – शास्त्रीय महत्व | ४३ |
| ६ | पंचसूत्री ४ : – पंचगव्याचा वापर | ५० |
| | – पंचगव्य कसे तयार करावे | ५१ |
| | – पंचगव्य वापरण्याची पध्दत | ५३ |
| ७ | पंचसूत्री ५ : – सेंद्रीय शेती प्रमाणिकरण (पी.जी.एस.) व शेतक–यांची उत्पादक कंपनी | ५६ |
| | – सेंद्रीय शेती प्रमाणिकरण | ५७ |
| | – शेतक–यांची उत्पादक कंपनी | ७५ |
| | – शेतीमालाचे सध्याचे बाजार व्यवस्थापन व प्रभावी पर्याय | ७७ |
| | – शेतक–यांची उत्पादक कंपनीचे उपक्रम | ८० |
| ८ | सेंद्रीय शेतीमाल विक्रेत्यांची यादी | ८३ |

# मॉफची उद्दिष्टे

- सर्वसामान्य शेतक–यांपर्यंत शाश्वत शेती / सेंद्रीय शेती तंत्रज्ञान पोहचविणे
- शेतक–यांना कमी खर्चाची, बिनकर्जाची व शाश्वत उत्पन्न देणारी पीक लागवड पध्दती शिकवून आत्महत्या पासून परावृत्त करणे
- शेतीमाल मूल्यवृध्दी व प्रक्रिया उद्योगास चालना देणे.
- शेतक–यांसाठी सुलभ व परवडणाऱ्या "पी.जी.एस." सेंद्रीय शेती प्रमाणिकरण पध्दतीचा प्रचार करणे.
- सेंद्रीय शेतीमालासाठी योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी समन्वयकाची भूमिका बजावणे.
- सेंद्रीय शेतीमाल उत्पादक शेतकरी ते ग्राहक सरळ साखळी निर्माण करणे
- सेंद्रीय शेतीत महिलांचा सहभाग वाढवून त्यांना स्वावलंबी करणे
- विषमुक्त सेंद्रीय अन्न सेवनाबद्दल ग्राहक वर्गात जनजागृती व प्रबोधन करणे
- सेंद्रीय शेती प्रशिक्षणे, कार्यशाळा, चर्चासत्रे, शिबीरे, अभ्यासदौरे, मेळावे आयोजित करणे
- सेंद्रीय शेतकरी, तंत्रज्ञान, संशोधन, प्रयोग, यशोगाथा, अनुभव यांची समग्र नोंद ठेवणे (Documentation)
- प्रसिध्दी साहित्य (सी.डी, पुस्तके, घोषवाक्ये, घडीपत्रिका इ.) तयार करणे.

# मॉफचे सहकारी

- अन्न व कृषि संघटना, संयुक्त राष्ट्रसंघ (FAO-UN)
- आंतरराष्ट्रीय शाश्वत शेती संस्था, पुणे (IISA)
- इंटरनॅशनल कॉम्पीटन्स सेंटर फॉर ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर, बेंगलोर (ICCOA )
- जीन कँपेन, नवी दिल्ली
- रिसर्च फाऊंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी ॲन्ड इकॉलॉजी, नवी दिल्ली
- सेंटर फॉर एव्हिरॉनमेंट एज्युकेशन, नवी दिली (CEE )
- दी कन्व्हेनंट सेंटर फॉर डेव्हलपमेंट, नवी दिल्ली (CCD)
- डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी, नवी दिल्ली (DBT)
- ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया, गोवा (OFAI)
- नॅशनल सेंटर ऑफ ऑरगॅनिक फार्मिंग, गाझीयाबाद (उत्तर प्रदेश) –NCOF
- अलायन्स फॉर सस्टेनेबल ॲन्ड होलीस्टीक ॲग्रीकल्चर, नवी दिल्ली –ASHA
- कृषि आयुक्त, कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
- कृषि विद्यापीठ – राहुरी, अकोला, परभणी व दापोली
- इतर संस्था – मिटकॉन, अफार्म, नोका, इनोरा, ग्रामपरिवर्तन, पाणीपंचायत, वोफा, हमारा बीज अभियान, कृषि विज्ञान केंद्र इत्यादी

# मॉफची संरचना

| | | |
|---|---|---|
| १. कार्यक्षेत्र | :- | - महाराष्ट्र राज्य<br>- ३२ जिल्हे<br>- १४० तालुके<br>- १५,००० गाव |
| २. मुख्य कार्यालय | :- | पुणे |
| ३. विश्वस्त | :- | १० |
| ४. सर्वोच्च समिती सदस्य | :- | १२७<br>(३-४ अनुभवी सेंद्रीय शेतकरी प्रती जिल्हा) |
| ५. सल्लागार समिती | :- | अध्यक्ष - डॉ. विजय भटकर, उपाध्यक्ष - श्री. पी.बी. शितोळे व इतर शेती तज्ञ-१० |
| ६. जिल्हा प्रमुख | :- | ३२ (अनुभवी सेंद्रीय शेतकरी) |
| ७. सभासद स्वयंसेवी संस्था | :- | १२० |
| ८. संपर्क शेतकरी संख्या | :- | १,४२,००० |

# प्रमुख उपक्रम

- सेंद्रीय शेती शाळा, मॉडेल फार्म, प्रात्यक्षीक
- प्रशिक्षण –

  विषय

  १. मूलस्थानी मृद संधारण व जलसंवर्धन
  २. विज्ञानाधारीत सेंद्रीय पीक लागवड पध्दत
  ३. पीकपोषण, कीड, रोग व तण व्यवस्थापन
  ४. सेंद्रीय प्रमाणिकरण (पी. जी. एस. पध्दती)
  ५. सेंद्रीय शेतीमाल मूल्यवृध्दी व प्रक्रिया पध्दती
  ६. बाजारपेठ
  ७. सेंद्रीय शेती नोंदी
- तांत्रिक मार्गदर्शन (निविष्टा उत्पादन, विक्री व्यवस्थापन)
- शेतक-यांची उत्पादक कंपनी (फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी)
- अभ्यासदौरे
- बियाणे बँक
- स्वावलंबी गाव निर्मिती प्रकल्प
- सेंद्रीय शेती अनुभव, प्रयोग, यशोगाथा, संशोधन इ. नोंदी (**Documentation** )
- सेंद्रीय माहिती साहित्य – पुस्तके, सी.डी, माहितीपत्रके, घडीपत्रिका इ.
- सेंद्रीय मेळावे, चर्चा सत्रे, मंडी बाजार, प्रदर्शने, कार्यशाळा इ.
- इतर उपक्रम – स्वयंसेवी संस्थांना सहकार्य, राज्य सेंद्रीय शेती धोरण समितीत पुढाकार, जी.एम विरोधी चळवळीत सहभाव, बचत गट, महिला सक्षमीकरण इत्यादी.

# ACHIEVEMENTS OF THE MISSION




MAHARASHTRA ORGANIC FARMING FEDERATION
1031/11, Balaji Niwas, Flat No 5, Cosmos Bank Lane, Deep Bungalow Chow, Model Colony, Pune - 411 016
Tel.: 020 25659090 / 020 32907302, Email : moffpune@gmail.com Website : www.moffindia.com




MOFF
REGIONAL PGS FEEDBACK WORKSHOP
National Centre of Organic Farming, Ghaziabad (U.P.)
Date : 20th – 21st Sept, 2010
Maharashtra Organic Farming
(MOFF)
(IISA)






MOFF
PROJECT ON
SELF SUSTAINABLE BIOVILLAGE:JAMBHARUN
स्वावलंबी सेंद्रिय गाव निर्मिती प्रकल्प:जांभरुन ता.लोहा जि.नांदेड
मार्फत: महाराष्ट्र ऑरगॅनिक फार्मींग फेडरेशन, पुणे.
(मो. ९४२३६१४९८९, ९८८१४९७०९२)

## सेंद्रीय शेती व अन्नसेवन कशासाठी

१. कुटूंबाच्या स्वास्थ्यासाठी (Family Health)

२. पुढील पिढींच्या आरोग्यासाठी (Future Generation Health)

३. जमिनीच्या आरोग्य वृद्धीसाठी (Land Health)

४. पाणी प्रदूषण रोखण्यासाठी (Water Pollution)

५. पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी (Environment)

६. जैववैविध्य संवर्धनासाठी (Biodiversity Conservation)

७. शेतक–यांच्या समृध्दीसाठी (Well – being of farmers)

८. अन्नदात्या शेतक–यांचे ऋण फेडण्यासाठी (Felicitation of Son of Mother Earth)

**सेंद्रीय पदार्थ केवळ पदार्थ नव्हेत, तर संकल्पना (Not Just Commoditity, But Ideology)**

# सेंद्रीय शेती – यशाची पंचसूत्री

| | |
|---|---|
| १. **देशी गाय** | (Indigenous Cow ) |
| २. **अॅरोग्रीनचा वापर** | (Arogreen ) |
| ३. **पिकाचे योग्य वाण व मिश्रपीक पेरणी** | (Suitable Variety & Multiple Cropping) |
| ४. **पंचगव्याचा वापर** | (Panchagavya) |
| ५. **सेंद्रीय शेती प्रमाणिकरण (पी.जी.एस.) व शेतक–यांची उत्पादक कंपनी** | (Organic Certification (PGS) & Farmers Producer Company) |

# पंचसुत्री – १.

## देशी गाय

**(Indigenous Cow)**



# १. देशी गाय

## !! गोमये वसते लक्ष्मी !!

एका देशी गाईच्या मदतीने ४ हेक्टर शेतात सेंद्रीय पिके यशस्वीपणे घेता येतात

**गोमूत्र**

**बीजामृत ,जीवामृत, पंचगव्य,
बनवण्यास उपयुक्त कीडनाशक,
रोगनाशक,प्रतिसारक,वाढवर्धक**

**दूध**

**पंचगव्य, बीजामृत, बुरशीनाशक,
विषाणू नाशक, काही प्रमाणात कीडनाशक**



**दही**

**पंचगव्य बनवण्यास उपयुक्त**

**ताक**

**पंचगव्य, अळी वर्गीय कीड नियंत्रक
तसेच उपयुक्त बुरशीनाशक**

**शेण**

**कंपोस्ट, शेणखत, बीजामृत, जीवामृत,सी.पी.पी., बायोडायनामिक,
पंचगव्य, अमृतपाणी, घनजीवामृत  बनवण्यास उपयुक्त, जमिनीत जिवाणू
संख्या वाढवते तसेच उपयुक्त बुरशी , स्युडोमोनस फ्लुओरसन्स वाढवते.
ॲक्टीनोमायसिटस, यीस्ट व मोल्ड, Asymbiotic N Fixers, PSD,
Plant Growth Promoters मुळे पीकवर्धन,कीड व रोगनाशकांचे
कार्य**

सेंद्रीय शेतीचा मूलाधार देशी गाय आहे. प्रत्येक शेतक-यांने देशी गाय मग ती दूध देणारी नसली तरी पाळली पाहिजे. शेतातील सर्व पिकांसाठी आवश्यक असणारे सेंद्रीय खत, कीड व रोगनाशक म्हणून काम करते शिवाय शेण, गोमूत्राच्या वापराने जमिनीची उत्पादकता वरचेवर वाढत जाते.

गाईपासून शेण, गोमूत्र, दूध (दही, ताक, तूप) व मशागतीसाठी बैल मिळत असल्याने सर्वच दृष्टीने गाय उपयुक्त ठरते.

## देशी गाईच्या तुलनेत संकरीत गाईच्या शेण व दूध पौष्टीक तत्व कमी आहेत.

| अ.क्र | घटक | गाईचे शेण | | गाईचे दूध | |
|---|---|---|---|---|---|
| | | देशी सहिवाल मि.ग्रॅ / कि. | संकरीत (HF) मि.ग्रॅ / कि. | देशी सहिवाल मि.ग्रॅ / कि. | संकरीत (HF) मि.ग्रॅ / कि. |
| १ | लोह | १०२.६३ | ६४.०६ | ३३.३० | ११.४० |
| २ | जस्त | १०.६६ | १०.६४ | ५.६८ | ३.६६ |
| ३ | तांबे | २.६६ | २.४१ | ०.०३३ | ०.०३२ |
| ४ | मॅग्नेशियम | २७६४.८३ | २१४२.४६ | २६३.०७ | २२०.६५ |
| ५ | कॉल्शियम | १२७६.६७ | ८३३.२३ | ७८३.१४ | ७५३.६४ |
| ६ | पोटॅशियम | १५८३.७५ | १६६३.६१ | १८००.०० | १३१६.४४ |

**संदर्भ :- भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, मुंबई**

# गाईपासून मिळणा-या सेंद्रीय निविष्ठा

१. **शेण :-**

- शेणाचे पाणी पिकांना दिले तर पिके हिरवीगार होतात.
- असिंबियॉटीक नायट्रोजन फिक्सर्स, स्युडोमोनस फ्लुओरेसन्स, ॲक्टिनोमायसिटस, ईस्ट, मोल्ड, पीएसडी इत्यादी घटक असल्याने वाढवर्धक, कीडनाशक, रोगनाशक, व्हायरस विरोधक असून पिकांमध्ये प्रतिकार शक्ती निर्माण करण्याची क्षमता शेणात आहे.

२. **गोमूत्र** :- पीक लहान असतांना २-३ % गोमूत्र फवारणी व पीक फुलावर आल्यावर ५ ते १० % फवारणी केली तर पीक जोमाने वाढते व मिळणा-या मालाचे कीड रोगापासून संरक्षण मिळते व मालाची प्रतही सुधारते.

३. **शेण + गोमूत्र** :- हे दोन प्रमुख घटक वापरून बीजामृत, जीवामृत, गांडूळ खत, घनजीवामृत, पंचगव्य, बायोडायनामिक खत, अग्निहोत्र, सीपीपी, अमृतपाणी इत्यादी उपयुक्त सेंद्रीय निविष्ठा तयार करता येतात.

४. **दूध, ताक** :- फवारल्याने पिकांचे बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळते.




# ORGANIC MANURE

## Jeevamrut – Cow Dung, Urine, Jaggery, Gram flour



# JEEVAMRUT – FERMENTATION TANK




JEEVAMRUT – APPLICATION METHOD
22

# पंचसुत्री –२

## ॲरोग्रीनचा वापर

**(Arogreen)**

रासायनिक शेती करतांना जी.एम. / संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीड व रोग नाशक औषधे, तणनाशके व इतर विषारी रसायनांचा सतत वापर झालेला असतो. त्यामुळे जमिनीतील मोठे व सूक्ष्म जिवाणू, मित्र बुरशी, गांडूळ व इतर जीव जंतूची संख्या जवळजवळ नष्ट झालेली असते.

सेंद्रीय शेती सुरु करण्यापूर्वी जमिनीतील उपयुक्त जीवजंतू, गांडूळे, सूक्ष्मजिवाणू व मित्र बुरशींची अल्पावधीत वाढ करुन जमीन जिवंत व कसदार बनविण्यासाठी ॲरोग्रीनचा वापर करणे गरजेचे आहे. ॲरोग्रीन बियाणे खालील प्रमाणात मिसळून ते शेतात वाफसा अवस्थेत पेरावे.

---


( श्री. विजय पाटील, बेंगलोर कृषि विद्यापीठात ॲरोग्रीनवर पी.एच.डी करीत आहे.)

# ॲरोग्रीन बियाणे मिश्रणाचे घटक

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. बाजरी | – | ५ किलो | ९. धने | – | ५00 ग्रॅम |
| २. हरभरा | – | ५ किलो | १0. मेथी | – | १ किलो |
| ३. उडीद | – | १ किलो | ११. ताग किंवा धैंचा | – | १0 किला |
| ४. मटकी | – | १ किलो | १२. राजगीरा | – | १00 ग्रॅम |
| ५. मूग | – | १ किलो | १३. सूर्यफुल | – | ५00 ग्रॅम |
| ६. चवळी | – | 0.५ किलो | १४. अंबाडी | – | २00 ग्रॅम |
| ७. तीळ | – | २00 ग्रॅम | १५. कारळे | – | २00 ग्रॅम |
| ८. मिरची | – | ५00 ग्रॅम | | | |

वरील मिश्रण अंदाजे २५ ते ३0 किलो प्रति 0.४0 हेक्टर एकर जमिनीत पेरावे. निरनिराळे वाण एकत्र करतांना ॲरोग्रीन बियाणे मिश्रणात किमान ६0 % व्दिदल, ३0 % एकदल व १0 % तागवर्गीय, औषधी, तेलवर्गीय पिकांचा समावेश होईल याची खात्री करावी. पेरणी केल्यानंतर ४५ ते ६0 दिवसांनी कोणतेही उत्पन्न न घेता संपूर्ण पिकांची जमिनीलगत कापणी करावी व तेथेच बायोमास ठेवून कालांतराने सुकू द्यावे. त्यामुळे जमिनीत विविध गटाचे सूक्ष्म जिवाणू वाढतात, नैसर्गिक गांडूळे वाढतात व जमीन सशक्त बनते. अशा जमिनीवर केळी, ऊस, हळदीसारखे पीक घेतले तरी कोणतेही रासायनिक खत न वापरता चांगले उत्पन्न मिळते.

# ORGANIC SUGARCANE





# TRANSPORTATION TO ORGANIC PROCESSING UNIT



# पंचसुत्री – ३

## पिकाचे योग्य वाण व मिश्रपीक पेरणी

(Suitable Crop Variety & Multiple Cropping)

# १. पिकांचे योग्य वाण –

- पिकांच्या सरळ, सुधारीत व संमिश्र वाणास प्रथम प्राधान्य
- संकरीत बियाण्यास दुय्यम प्राधान्य
- जी.एम. (B.T) बियाणे अजिबात नको

**पिकांचे योग्य वाण :**

| अ.क्र. | पिकाचे नाव | योग्य वाण | |
|---|---|---|---|
| १ | ज्वारी | हलक्या जमिनीसाठी – फुले अनुराधा, सिलेक्शन – ३<br>मध्यम जमिनीसाठी – फुले चित्रा, फुले माऊली<br>भारी जमिनीसाठी – फुले वसुधा, फुले यशोदा, सी.एस.व्ही –२२,SPV – 462, CSV-13,15,17 , PKV – 801, CSV-20-23<br>बागायती जमिनीसाठी – फुले रेवती, सी.एस.व्ही. १८१८ , पी के व्ही ८०१, पी. के.व्ही ८०९, एस.पी.व्ही १६१६ | रबी ज्वारी – मालदांडी ३५–१, फुले अनुराधा, फुले वसुधा, फुले रेवती, फुले यशोदा, फुले माऊली, फुले. चित्रा, परभणी मोती<br>लाहयासाठी ज्वारी – फुले पंचमी<br>हरड्यासाठी – फुले उत्तरा –१०१<br>गोड ज्वारी – SSV 84, CSV 24,55, CSV – 1955, CSS-2255, AKSSV-22 |
| २ | बाजरी | पी सी – सबुरी (परभणी संपदा), बाजरी २२४० (गोसावी प्रतिबंधक)<br>शांती RHRBH 9808 , संकरीत श्रध्दा -RHRBH – 8609, ABPC- 4-3 (MAU) | |
| ३ | नागली | हळवी – दापोली नं १, निमगरवी – शारदा,ई .३१ गरवी –हंसा, आ युटी –२, कोंकण सफेद | |
| ४ | भात | सुगंधा, अविष्कार, पराग, फुले समृध्दी , आंबेमोहर, इंद्रायणी, कोळंब, कृष्णा, वैभव, | |

| | | |
|---|---|---|
| | | नारा, नीला, सुरक्षा – PKV- खमंग, भोगावती |
| ५ | मका | प्रभात, शक्ती, मांजरी, किरण, पंचगंगा, नवज्योत, आफ्रिकन टॉल, राजर्षी - PKVM - शतक– ह्यूनीस , अरूण , MPQ - 13 |
| ६ | कापूस | एन एच ६१५, एन.एच. ६३०, पी.एच ३४८, फुले जे. एल.ए. ७९४, फुले ६८८, फुले धन्वंतरी, फुले अनमोल (देशी २०११) |
| ७ | गहू | जिराईत पेरणीसाठी : पंचवटी (NIDW - 15),शरद (AKDW-2197-16)<br>जिराईत व मर्यादीत सिंचन : नेत्रावती (NIAW-1415) १०८ दिवस.<br>बागायत वेळेवर पेरणीसाठी : तपोवन (NIAW-917)<br>गोदावरी (NIAW-295), त्र्यंबक (NIAW-301)<br>बागायत उशिरा पेरणीसाठी – NIAW-34<br>MACS – 6222<br>NIAW – 917<br>MACS - 3125<br>AKAW – 4627<br>राज – ३७६५ (PKV)<br>WSM – 1472 (कोरडवाहू)<br>कुदरत – ९, कुदरत – १७<br>MACS – 1967 |
| ८ | मूग | बी पी एम आर–१४५, वैभव, बी–४, टी–४४, जनकल्याणी (रघुवंशी) |
| ९ | उडीद | बी डी यू – १, टी ए यू – १ , PKV - 15 |
| १० | नाचणी | फुले नाचणी |
| ११ | करडई | एस.एस.एफ – ६५८, जे.एस.आत. – ७, ७३, जे.एस.एफ. १७, पी.बी.एन.एस. – ४०, को. – १ (बिनकाटेरी ), , PBNS-12, AKS – 217, AKS-31, JLSF-414, SSF-658<br>संकरीत – डी.सी.एच १२९, एम.के.एच. – ११, एन.आर.एस. ए. ५२१, पी.एच. – ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | AKS – 311 (PKV- Pink), SSF- 708 (MPKV), PKV हरिता (AKS 9302-12) | |
| १२ | हरभरा | पी के व्ही –२, विजय , विशाल , बी डी एन ७९७, जे.एल –११, सुशिल लक्ष्मी , PKV , – तारा , विराट, विहार, श्वेता - ICCV-2 , कृपा, काक –२ (ICCU-10) | |
| १३ | तूर | बी एस एम आर – ७३६ (लाल), बी एस एम आर ८५३ (पांढरी), विपुला, आय सी पी एल – ८७ , कुदरत –३ , बी डी एन – ७११, (नवीन – १५० दिवसांची) | |
| १४ | भुईमूग | टी ए जी २४, टी जी २६, टी जी ५२६, टी एल जी ४५, टी पी जी – ४१,फुले उनप जे एल ५०१, स्पॅनीश (BARC), फुले न्यास, टीजी –१९ , कराड, फुले आर.एच.आर.जी – ६०२१ (उन्हाळी) धीरज –१०१ , AK 303 | |
| १५ | सूर्यफूल | एस एल –११, एस एस ५६, पी के व्ही एस एफ– १, फुले रविराज , भानू | |
| १६ | सोयाबीन | जे एस – ३३५, एम ए यु एस – ७१, एम ए यु एस – ८१ , एम ए सी एस ४५०, एम ए सी एस १२४, पी के १०२९,एम.ए.सी.एस – ११८८ (१०० दिवस – २४ क्विं / हे ) जे.एस ह्र ९७५२, जे.एस ९३०५ , MAUS 158 | |
| १७ | एरंडी | गिरीजा , डी सी एस – १ | |
| १८ | मोहरी | पुसा बोल्ड, ए सी एस – १, वरूण , सौरभ | |
| १९ | वाटाणा | बोनोव्हिला , सिलेक्शन–९३, रचना, आर्केल , फुले प्रिया (२०१०) | |
| २० | कांदा | पी के व्ही सिलेक्शन , फुले समर्थ, पूना फुरसुंगी, ॲग्रो फाऊंड लाईट रेड, एन –२–४–१, भीमा सुपर, भीमा राज, भीमा रेड (राजगुरूनगर) बसवंत (लाल) | रब्बी हंगाम–भीमा किरण, भीमा शक्ती, भीमा श्वेता, पंजाब सिलेक्शन, पुसा रतनार, पुसा माधवी, पुसा रेड, अर्क निकेतन |
| २१ | लसूण | जी–४१, सिलेक्शन–१, जी–५०,जी–२२३,जी–३१३, फुले बसवंत , श्वेता, गोदावरी, यमुना, सफेद, ॲग्रीफाऊंड व्हाईट | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | मिरची | लाल मिरची – सी.ए. ९६०, पंत सी – १, जी – ३, एक्स २३५, जयंती, अग्निरेखा, फुल सूर्यमुखी, फु. ज्योती , अर्का लोहीत , कोकण कीर्ती | |
| २३ | भेंडी | फुले उत्कर्षा, फुले किर्ती, ए के ओ व्ही –९७–१६, पी.बी. एन. ओके – १ (परभणी) | हिरवी मिरची – ज्वाला एन.पी. ४६–ए, उन्हाळी – ज्वाला, एन.पी. ४६–ए |
| २४ | वांगे | पुसा हरीता, कृष्णा, परभणी, यशश्री, अरूणा, पुसा क्रांती, मांजरी गोटा, रूचिरा , पुसा पर्पल रावूंड, पु.प. लाँग, पु.प. क्लस्टर , फुले अर्जुना (आर.बी.एस – ९) – संकरीत, वैशाली, प्रगती | |
| २५ | चवळी | फुले पंढरी, फुले दोफसली, कोकण सदाबहार, अजित –२२, जे सी –३, व्ही एस एम –८ | |
| २६ | राजमा | सुयश, वरूण | |
| २७ | दुधी भोपळा | सम्राट | |
| २८ | मधुमक्का | माधुरी , प्रिया | |
| २९ | वांगे | ऋतुराज (३ हंगाम ) फुले पांढरी , फुले दोफसली, कोकण सदाबहार, अजित –२२ , पुसा फाल्गुनी, पुसा बारसमती , पुसा कोमल , अर्का गरीमा , कोकण वाल | |
| ३० | चवळी | ऋतुराज (३ हंगाम ) फुले पांढरी , फुले दोफसली, कोकण सदाबहार, अजित –२२ , A JC- 3 , VSM – 8 पुसा फाल्गुनी, पुसा बासमती , S- 288, पुसा कोमल , अर्का गरीमा , कोकण वाल | |
| ३१ | राजमा | सुयश , वरूण | |
| ३२ | काकडी | हिमांगी, फुले शुभांगी, फुले प्राची, पूना खिरा, शीतल, पुसा संयोग | |
| ३३ | घेवडा | फुले सुयश, वरूण, एच पी आर – ३५ | |
| ३४ | मुळा | पुसा केतकी, पु.देशी, पु.रेशमी, पु. हिमानी, जपानीज व्हाईट, पंजाब सफेद, कल्याणपूर नं. १, जोनपुरी, अर्का निशांत, चायनीज रोग, आय.एच.आर.आय – १, | |

| | | |
|---|---|---|
| | | रॅपीड (लाल), इ. |
| ३५ | फुल कोबी | लवकर येणा–या – पुसा कातकी, पु. दिपाली, अर्ली कुंवारी, अर्ली पाटना मध्यम मुदतीच्या – सुधारीत जपानी, आघानी, पुसा सिंथटेक, पुसा गुभ्रा उशीरा येणा–या, स्नो बॉल – १६, स्नो बॉल – १, इसी १२०१३ |
| ३६ | टमाटे | पुसा रुबी, रोमा, पंजाब, छुआरा, पुसा गौरव, अरका सौरभ, वसुंधरा, राजश्री, फुले राजा (संकरीत) |
| ३७ | पानकोबी | गोल गड्डे – गोल्डन एकर, प्राईड ऑफ इंडिया सपाटे गड्डे - पुसा ड्रमेहड, अर्ली ड्रम हेड |
| ३८ | तीळ | खरीप– ए के टी– ६४, अर्धरब्बी– एन –८ , उन्हाळी –एके टी १०१ ,<br>पी के व्ही एन टी –११–९१ , JLT 408 (MPKV- 2010) |
| ३९ | कारळ | फुले कराळा, आय जी पी एन, सह्याद्री |
| ४० | कोथींबीर | सी एस –२,४,६, व्ही–१, व्ही–२, युडी–४१, सी ओ –१,२, जळगाव धने, वाई धने |
| ४१ | बटाटे | कुफरी चंद्रमुखी, कु. ज्योती, कु. जवाहर, कु. लवकर, कु. चिपसोना–१,२ कुफरी पुखराज कु. अलंकार , कु. मुथू , कु. खासीगारोग , कु. बादशाह , दार्जिलींग रेड, रावूंड (DRR) कु. चमत्कार , इ. |
| ४२ | वाल | कोकण भूषण, जी के –१,३ (फुले सुरुची) |
| ४३ | आले (आद्रक) | महिमा, रिओडीजानीरीओ, कालिकत, स्थानिक |
| ४४ | हळद | सेलम, टेकुरपेटा, कृष्णा, फुले स्वरूप NAU -1 (गुजरात ) |
| ४५ | कुळीथ | सीना, माण |
| ४६ | मटकी | एम बी एस – २७ |
| ४७ | दुधी भोपळा | ऋम्राट, लाल भोपळा , CO-1 , CO-2 अर्का चंदन , अर्का सूर्यमुखी , पुसा विश्वास, CM – 4, पुसा विकास |
| ४८ | राजगिरा | फुले कार्तिकी |

| | | |
|---|---|---|
| ४९ | गाजर | नॉन्टेन्स, चंन्दनी , पुसाकेअर , देशी ऑरेंज, पी – २९ |
| ५० | पालक | ऑलग्रीन, पुसा ज्योती , पुसाहरीत |
| ५१ | शेवगा | कोईमतूर – १,२, पी के एम १,२, कोकण रूचिरा, ओडीसी (फुल, फळ, शेंगा एकाचवेळी) धनराज , रोहीत –१ |
| ५२ | रताळी | कोकण अश्विनी, वर्षा, श्रीवर्धिनी |
| ५३ | साबुकंद (Tapioca) | एच–२२, एच १६५, श्रीप्रकाश, एस १३१०, पेट्टी पुरम, श्री विजय, टी.सी – ५, सी. आय ६४९ |
| ५४ | जवस | एन.एल.११७,९७,१४२,१६५,२६० पी के एन एल –२६० |
| ५५ | उस | फुले २६५, सी ओ ९४०१२, सी ओ ८६०३२, सी ओ ८०९४, सी ओ एम ८८१२१, सी ओ सी ६७१, सी ओ ७५२७ , co – 92005, COVSI – 9805 , VSI 434 ( यशवंत)<br>मराठवाडा – सी ओ ८६०३२, सी ओ ९४०१२, सी ओ सी ६७१, सी ओ व्ही एस आय ९८०५, सी ओ एम २६५<br>– तांबेरा भागात सी ओ ६७१, ७५२७ लावू नयेत<br>– पाणी कमी असेल तर फुले २६५ किंवा सी ओ ८६०३२ लावावे.<br>– उसाच्या रस धंद्यासाठी देशी वाण वाळा व जवारी (६ गुंठ्यात ६ टन)<br>बेणे संपर्क – जगन्नाथ रावळ रा. बुगरे आलूर ता. चिक्कोडी, जि. बेळगाव (कर्नाटक) |
| ५६ | चारा पिके | लुसर्न – आर.एल. ८८, सिरसा – ९, आनंद – २ आणि ३<br>ज्वारी – रुचिरा, फुले अमृता, मालदांडी ३५–१, एसएसजी ५९–३, पुसाचारी, एम.पी.चारी, निळवा<br>बाजरी – जायंट बाजरा, राजको बाजरा<br>मका – आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, विजय, गंगा सफेद – २<br>ओट – फुले हरिता, केंट, जे.एच.ओ – ८२२ |

| | | |
|---|---|---|
| | | बरसीम – वरदान, मेस्कावी, जेबी – १, जे एच.बी – १४६<br>चवळी – श्वेता, ई.सी ४२१६, बुंदेल लोबीया, यु.पी.सी ५२८६<br>संकरीत नेपियर गवत, यशवंत, फुले जयवंत स्टायलो ,फुले क्रांती मारवेल, गजराज, दशरथ, कोकण– हापूस, रत्ना , केशर<br>विदर्भ – नागीन , केशर, पायरी, नीलम, तोतापुरी, दशेरी, बेनिशान |
| ५७ | पपई | कुर्ग हनीड्यू, सोलो , co-1,2,5,6 तैवान ९८६ , पुसा डेली सिअर |
| ५८ | आंबा | सुवर्णा (संकरीत –३११) हापूस × नीलम (कोकण विद्यापीठ) मराठवाडा ह्र केशर, निरंजन, लंगडा, पायरी, नीलम |
| ५९ | चिक्कू | काली पत्ती, क्रिकेट बॉल , क्रो–१ , छत्री |
| ६० | अंजीर | पूना अंजीर, दिनकर , कॅप्री अंजीर, सॅनपॅरो, स्मिरना अंजीर, पूना फीग |
| ६१ | द्राक्ष | माणिक चमन,थॉमसन सीडलेस, बेंगलोर पर्पल, शरद, सोनाका, नान गणेश |
| ६२ | मोसंबी | फुले मोसंबी (सिलेक्शन–४), नगर, न्युसेलर, काटोल गोल्ड |
| ६३ | लिंबू | फुले सरबती, कागदी लिंबू, विक्रम, प्रमालीनी , चक्रधर, नेनाली, PKM – 1 साईशरबती, जयदेवी, PDKV - लाईम |
| ६४ | काजू | वेंगुर्ला–१, वेंगुर्ला –४,५,६,७,८ |
| ६५ | नारळ | बाणावली , टी × डी , डी×टी, लक्षद्वीप, प्रताप , वेस्ट कोस्ट टॉल |
| ६६ | पेरू | लखनौ –४९ (सरदार), अलाहाबाद सफेद, अर्का मृदुला , ललीत , सिलेक्शन – २ , संकरीत –१ |
| ६७ | आवळा | कृष्णा, कांचन, चकय्या, नीलम , NA- 16, NA – 7 आनंद –१,२ |
| ६८ | करवंद | कोकण बोल्ड |
| ६९ | केळी | श्रीमती ग्रॅड नैन (टिश्यू), अर्धापूरी, हरसाल, सफेद वेलची, महालक्ष्मी |
| ७० | अननस | क्यू, क्वीन, मॉरिशियस जॉईट क्यू |
| ७१ | डाळींब | आरक्ता, मृदुला, गणेश, भगवा , आळंदी, काबूल, कंधारी, मस्कत रोड, ढोलका, पेपरशेळ |

| | | |
|---|---|---|
| ७२ | सिताफळ | बालानगर , एन एम के – १ (श्री. कसपटे – मो. ९८२२६६९७२७)अर्का सहन , ॲनोना हायब्रीड –२, सिताफळ ×लक्ष्मणफळ cross) NKM-1 |
| ७३ | चिंच | प्रतिष्ठान |
| ७४ | जांभूळ | धारूर, बहारडोली |

**संपर्क :-**

- मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी फोन नं. ०२४५२/२२३८०१,०२,०३
- डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला फो नं. ०७२४/२५८२०० ते ०७
- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर

  फोन नं. ०२४२६/२४३२२७,२४३३५५,२४३८६१,२४३१०६,२४३२२६

  (चारा पिके संशोधन केंद्र – ०२४२६ / २४३२५६)
- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी –४१५ ७१२

  फोन नं. ०२३५८/२८२४१७,२८०२३८,२८०२३३
- श्री. प्रकाशसिंग रघुवंशी – रघुवंशी शोध समिती ग्राम – टडिया, पोस्ट जक्खीनी, जि. वाराणशी –२२१३०५ (उत्तरप्रदेश) मो. ०९९५६९४१९९३, ०९४१५६४३८३८

  Email :- kudarat_raghuvanshi@hotgmail.com
- “ लोकायत” संगमनेर,ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर, श्री. पांडे सारंग
- श्री. सुधाकर साबळे मु.पो. वडूथ ता.जि. सातारा मो. ९३७१३१२८९९, ०२१६२ – २६४३०२ (आवळा, शेवगा व आयुर्वेदीक वनस्पती उत्पादने)
- कांदा व लसूण संशोधन संचालनालय, राजगुरुनगर, जि. पुणे, फोन नं. ०२१३५ – २२२०२६, २२२०६०

# २. मिश्र पीक पेरणी (Multiple Cropping ) :

## प्रमुख पिकांत योग्य आंतरपिकांची लागवड करणे अत्यंत आवश्यक आहे :

पिकाची पेरणी करतांना मुख्य पिकांसोबत ४ ते ८ योग्य सहयोगी पिकांची लागवड केल्यामुळे खालील फायदे होतात.

१. मुख्य पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असणारी मुलद्रव्ये मिळतात (Nutrient Management )

२. पिकाला कीड व रोगापासून संरक्षण मिळते. (Insect & Disease Management )

३. पिकामध्ये तणांचा प्रादुर्भाव कमी होवून मजुरी खर्च वाचतो (Weed Management )

४. मूलस्थानी मृद व जलसंवर्धन होण्यास मदत होते. (In-situ Soil & Moisture Conservation)

५. जमिनीचा पोत सुधारतो व भौतीक, रासायनिक व जैविक गुणधर्म सुधारल्यामुळे उत्पादकता वाढते. (Soil Productivity)

६. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे (पाऊस, धुके, थंडी, गारपीट, बाजारभाव इ) एखादे पीक गेले तरी त्याची भरपाई दुस-या पिकांमधून होते (Income Risk Management )

७. शेतक-याच्या गृहिणीला एकाच वेळी दाल, रोटी, भाजी इ. मिळून घरखर्च वाचतो. (Kitchen Food Requirement)

८. स्वत:चा व देशाचा अन्न सुरक्षेचा प्रश्न सुटण्यास मदत होते. (Food Security )

# मुख्य पीक व त्यातील योग्य सहयोगी मिश्र पिके

१. भात –ग्लिरिसिडीया, मका, चवळी

२. सोयाबीन – मका, तीळ, धने, मेथी,तुर – भोवताली एरंडी, सूर्यफूल (सापळा पिके)

३. कापूस – मका, तूर, मूग, चवळी , लाल अंबाडी, रानवांगी, उडीद, झेंडू, हरभरा, भूईमूग

४. ऊस –धने , कांदे, मेथी, मिरची, मका, हरभरा,भुईमूग,चवळी (हंगामनिहाय मिश्रपिके)

५. गहू – मोहरी, झेंडू, मका, कोथींबीर

६. भूईमूग – मका, तूर, मिरची, धने, हरभरे, चवळी, बीन्स (वाल), सूर्यफूल

७. हळद – मका, धने , एरंडी, सोयाबीन, मधुमका, मिरची, मूग, घेवडा, पालेभाज्या, मेथी

८. आले (आद्रक)– मधुमका, मिरची, धने, झेंडू, चवळी,कांदा

९. सूर्यफूल – मका, तीळ, मूग, चवळी, कांदा, भूईमूग

१०. जवस + हरभरा ( ४:२), भोवताली मका

११. जवस + करडई (४:२)

१२. भाजीपाला – मका, चवळी, झेंडू, मोहरी, धने

१३. कोबी– मका, चवळी, मोहरी,मिरची

१४. तूर – मूग, सोयाबीन, उडीद, मका, झेंडू

१५. हरभरा– मेथी, धने , मका, तीळ

१६. मिरची –एरंडी, मका, तीळ, चवळी, झेंडू, बडीशेप, झेंडू

१७. टोमॅटो – मका, चवळी, झेंडू, धने, कांदा

१८. मका – गाजर, करडई, कोथींबीर, मेथी, पालक

१९. करडई – जवस, हरभरा, कांदा

२०. फळझाडे –१. सिताफळ – चिंच, बोर, आंबा, जांभूळ/कवठ +(आंतरपिके– हंगामी २ वर्षे )

२. डाळींब – शेवगा,ग्लिरिसिडीया, सिताफळ, हादगा +

(आंतरपिके – हंगामी २ वर्षे)

३. आवळा – सिताफळ, हादगा + (आंतरपिके – हंगामी २ वर्षे )

४. पपई – आंबा, चिकू, सिताफळ + (आंतरपिके– हंगामी २ वर्षे )

५. आंबा – चिंच, चारोळी, शेवगा, लिंबू,फणस, जांभूळ, सिताफळ,

रामफळ +(आंतरपिके – हंगामी २ वर्षे )

६. चिकू – चिंच, लिंबू, आंबा + (आंतरपिके हंगामी –२ वर्षे )

# आंतरपिकांचे शास्त्रीय महत्व

१. ज्वारी, मका –परोपजिवी मित्र कीड ट्रायकोग्रामा वाहक, पक्षी थांबा, चारा

२. चवळी –रस शोषणाऱ्या किडीसाठी सांपळा पीक, द्विदल नत्र पुरवठा, तणविरोधक, बायोमास

३. सूर्यफूल – मधमाशा (परागिकरण), पक्षीथांबा

४. धने –औषधी गुणधर्म, रोग रोधक, परोपजिवी बुरशी ट्रायकोडर्मा वाहक

५. मोहरी –आयसोथायोसायनेट द्रव्यामुळे तणांचे बी मरते, झिंक पुरवठा, कोबीसाठी घाण्या रोग रोधक

६. झेंडू – अल्फा टर्थीनाईल द्रव्य निमॅटोड (सूत्रकृमी) रोधक

७. हरभरे –ॲमिनो ॲसीड, कीड रोधक, नत्र पुरवठा (द्विदल)

८. तीळ –औषधी गुणधर्म , मधमाशा आकर्षण, परागिकरण मदत


९. तुळस –अल्कलॉईडस –२७ प्रकारचे, पीक वाढक, कीड व मूळकुजव्या रोधक

१०.बडीशेप – मधमाशी आकर्षक, परागिकरण मदत

११.रानवांगे –पांढरी माशी नियंत्रक

१२.कांदा –सल्फर पुरवठा,जमिनीत हवा खेळते. औषधी गुणधर्म

१३.मेथी –नत्र पुरवठा, तणविरोधक, सापळा पिक, उत्तम बायोमास (गांडूळ वृध्दी)


ORGANIC WHEAT

# ORGANIC BANANA WITH MIX CROP



# ORGANIC TURMERIC WITH MIXED CROPS



# ORGANIC TURMERIC WITH MIXED CROPS



# ORGANIC TURMERIC WITH MIXED CROPS



# ORGANIC SUGARCANE WITH MIXED CROP OF TURMERIC



# पंचसुत्री – ४

## पंचगव्याचा वापर

## (Panchagavya)

# पंचगव्याचे महत्व

पेरलेल्या पिकांकडे कीड रोग आकर्षित होवू नये व झाडांत नैसर्गिक प्रतिकाशक्ती निर्माण करण्यासाठी पंचगव्याचा वापर करणे आवश्यक आहे. पीकवर्धक, कीडरोगनाशक, व्हायरस विरोधक, पीक संरक्षक, प्रत सुधारक असे बहगुणी क्षमता असणारे पंचगव्य घरीच तयार करुन वापरता येते.

# पंचगव्य कसे तयार करावे

**घटक : –**

| | | |
|---|---|---|
| १. बायोगॅस स्लरी | – | ४ कि. |
| २. ताजे शेण | – | १ कि. |
| ३. गोमूत्र | – | ३ लि. |
| ४. गाईचे दूध | – | २ कि. |
| ५. गाईचे दही | – | २ कि. |
| ६. गाईचे तूप | – | १ कि |
| ७. ऊस रस | – | ३ लि. |
| ८. काळी पक्ष केळी | – | १२ नग |
| ९. ताडी | – | २ लि. |

**वरील घटकांपैकी :-**

१. बायोगॅस स्लरी नसेल तर ७ कि. शेण + ५ लि. गोमूत्र + ५ लिटर पाणी सावलीत ठेवा. रोज दोनदा ढवळा,मिथेन गॅस निघून जातो. १५ दिवसांनी त्यात दुसरे घटक मिसळा.

२. उसाचा रस नसेल तर ५00 ग्रॅम गूळ + ३ लि. पाणी द्रावण वापरा

३. ताडी नसेल तर १00 ग्रॅम यीस्ट पावडर + १0 ग्रॅम गूळ + १0 लि. कोमट पाणी द्रावण करा ताडीसारखे द्रावण १/२ तासात तयार होते/ किंवा २ लिटर शहाळे पाणी ७ दिवस हवाबंद ठेवा / किंवा शहाळे नसतील तर काळी द्राक्षे २ लिटर रस ७ दिवस हवाबंद ठेवून वापरा. सर्व घटक क्रमाने मोठया तोंडाच्या माठात किंवा सिमेंट / प्लॅस्टीक टाकीत मिसळा तोंड उघडे ठेवून सावलीत ठेवा, रोज २ वेळा हलवा, २२ व्या दिवशी पंचगव्य तयार होते. ६ महिन्यापर्यंत पंचगव्य वापरता येते. घट्ट झाल्यास त्यात पाणी मिसळावे.

# पंचगव्य वापरण्याची पध्दत

## १. पिकांसाठी :

- बीज संस्कार – बियाणे पेरणी आधी २० मिनीटे ३ % द्रावणात बुडवा (३ लि. पंचगव्य १०० लि. पाणी )
- फवारणी – ( सर्व पिकांसाठी ),

  पेरणीनंतर – २० दिवसांनी ३ % द्रावणाच्या, २ फवारण्या १५ दिवस अंतराने.

  पीक फुलावर आल्यावर, फळधारणेवेळी – ३ % द्रावणाच्या, २ फवारण्या १५ दिवस अंतराने
- पाण्यासोबत – पाटाच्या पाण्यासोबत हेक्टरी ५० लिटर (आंबा मोहर गळत नाही, मिरची फूलगळ होत नाही, लिंबाला नियमीत फुलोरा येतो).
- बियाणे साठवणुकीसाठी – ३ % पंचगव्याच्या द्रावणात बियाणे १५ मिनिटे बुडवून नंतर सावलीत वाळवून साठवावे व पुढील पेरणीसाठी वापरावे. बियाण्याला कीड लागत नाही व उगवणशक्ती चांगली राहते.
- गांडूळ बेडवर –३ % द्रावण फवारावे त्यामुळे गांडूळांची संख्या वाढते.
- पशुखाद्यामध्ये – पशुखाद्य (Concentrate) किंवा पेंडी सोबत पंचगव्य मिसळून खावू घातल्यास गाय म्हशीचे दूध वाढते.
- केळीचे कमळ तोडल्यावर पंचगव्य ३ % द्रावणात घड बुडवला तर केळीचा आकार व चकाकी वाढते.

## २. पशुंसाठी :

- पंचगव्य हे सूक्ष्म जिवाणू, किटाणू, बुरशी याचे अमृत आहे. कारण यात प्रथिने, कर्बोदके, मेद, ॲमिनो आम्ले, जिवनसत्वे, एन्झाइम्स (पाचके), ज्ञात अज्ञात वाढवर्धके, सूक्ष्म पोषणद्रव्ये , सूक्ष्म मुलद्रव्ये, प्रतिकारशक्ती उत्तेजके आहेत.
- जनावरांनी किंवा माणसांनी हे प्राशन केले तर पंचगव्यातील सूक्ष्म जिवाणूंमुळे शरिरातील प्रतिकारशक्ती पोटात घेतलेल्या जिवाणूविरूध्द जागृत होवून उठते व लसीसारखे (Vaccine) काम करते.
- कुत्री, डुकरे, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, गाई वर यशस्वी प्रयोग झालेत. पंचगव्याचे कोणतेही दुष्परिणाम नाही.

  उदा. कुत्री –(आजारी) –२०० मिली रोज –१० दिवस –जखम , पोट दुखणे, केस येणे (गळत गेलेले)साठी उपयुक्त,

  शेळी मेंढी – ५० –१०० मिली – वजन वाढते,

  गाई – पाण्यात व खाद्यात मिसळून दिल्याने रोज १०० मिली दूध वाढते, आजारी पडत नाहीत.
- आरोग्य चांगले राहते. दुधातील fat वाढते , लवकर गाभण राहते, ताप, लाळया खुरकत इ. रोग होत नाहीत. कातडी चमकदार, कांती आरोग्य संपन्न होते.
- भाताच्या काडावर (वैरणीवर) युरिया ऐवजी पंचगव्य शिंपडावे.
- कोंबड्या ब्रॉयलर –५ मिली / कोंबडी , पाणी / खाद्यात रोज मिसळून द्यावे
- मासे –फिशपॉंडमध्ये वापरता येते.

## ३. मानवी आरोग्यासाठी :

- कातडीवरील –पांढरे चट्टे, सोरायसीस –२१ दिवसात फरक जाणवला.
- एड्स रोगावर प्रयोग केले, अंथरूणावर खिळलेल्या पेशंटला रोज २०० मिली पंचगव्य १५ दिवस दिल्यावर भूक व पचनक्रिया सुधारली, वजन ३ कि.ग्रॅम वाढले, चालता येवू लागले. (तामिळनाडू प्रयोग)
- पंचगव्याला उग्र वास असल्यामुळे पेशंट घेत नाहीत, त्यासाठी १० मिली पंचगव्यात २०० मिली शहाळ्याचे पाणी मिसळावे + ५ मिली ताजा लिंबाचा रस + १० मिली मध मिसळून रोज सकाळी अनशापोटी घ्यावे.त्यानंतर ३ तासांनी जेवावे.
- मज्जासंस्था बिघाड, पार्कीन्सन रोगाने हात थरथरत होता –त्यावर पंचगव्याने सुधारणा दिसली. (तामिळनाडू प्रयोग)
- मधुमेह –अनशापोटी १० मिली गाळलेले पंचगव्य घ्यावे.
- क्षयरोग –१ आठवड्यानंतर ताप बंद झाला , २ आठवड्यानंतर खोकला बंद झाला –वजन वाढले.
- संधिवात –२ महिन्यात परिणाम दिसतो (सर्व तामिळनाडू प्रयोगाचे निष्कर्ष)

**विशेष माहिती** :– मधुमेहावर – प्रभावी आयुर्वेदिक औषध

| | | |
|---|---|---|
| मेजशृंगी (कावळी) | आवळा | जांभूळ बी |
| गुळवेल | बेलाची पाने | हिरडा |

समप्रमाणात वरील घटक मिसळावेत व रोज सकाळ संध्याकाळ २ चमचे पावडर घेतले तर मधुमेहामुळे होणाऱ्या तक्रारी कमी होतात. उदा. दृष्टी मंद होणे, मूत्रविसर्जनात अडथळे, हृदयाच्या ज्ञानतंतूचा क्षोभ इ.

# पंचसुत्री – ५

## सेंद्रीय शेती प्रमाणिकरण (पी.जी.एस.)

## व शेतक–यांची उत्पादक कंपनी

**(** Participatory Gurantee System &

Farmers' Producer Company**)**

## अ. सेंद्रीय शेती प्रमाणिकरण :

- उत्पादीत सेंद्रीय शेतीमाल कुठल्याही बाजारपेठेत विकण्यासाठी “सेंद्रीय पुरावा” म्हणून प्रमाणिकरण आवश्यक आहे.
- भारतात व भारताबाहेरील देशातील ग्राहक ‘ प्रमाणित’ मालालाच पसंती देतो.
- शेतातील प्रत्येक मालाला स्वतंत्र प्रमाणपत्र दिले जात नसून शेतक–यांचे शेत प्रमाणित केले जाते.
- सेंद्रीय शेती प्रमाणिकरणाच्या २ प्रमुख पध्दती :
    १. ॲग्रीकल्चरल प्रोसेस्ड फूड प्रोडक्टस् डेव्हलपमेंट ॲथॉरिटी (APEDA), नवी दिल्ली, मान्यता प्राप्त – २० संस्था
    २. ऑरग़ॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया (ओफाय), गोवा मान्यता प्राप्त पी.जी.एस. – १० स्वयंसेवी संस्था
- शेतक–यांना दोन्ही पर्याय निवडीसाठी उपलब्ध
- दोन्ही प्रणाली एकमेकांची स्पर्धक नसून पूरक आहेत (Complimentary)

# प्रमाणिकरणाच्या दोन पध्दती

**पध्दत :– १. अपेडा, नवी दिल्ली मान्यताप्राप्त प्रमाणिकरण पध्दती**

- ॲग्रीकल्चरल प्रोसेसड् फूड प्रोडक्टस एक्सपोर्ट डेव्हेलपमेंट ॲथॉरिटी, नवी दिल्ली (अपेडा) ने २० संस्थांना सेंद्रीय प्रमाणिकरणाचे अधिकार दिले आहेत.
- ति–हाईत संस्थेला शेती प्रमाणिकरण करण्याचे अधिकार – Third Party Certfication.
- IFOAM, EC - NO. 2092 / 91, ISO - 65 या आंतरराष्ट्रीय निकषांचा वापर
- अमेरिकेत, NOPUSDA, जपानमध्ये JAS, युरोपीय देशात AU 2092 / 91 निकषांचा वापर
- भारतात NPOP (नॅशनल प्रोग्रॅम फॉर ऑरगॅनिक प्रोडक्शन) दर्जाचे प्रमाणपत्र
- प्रमाणिकरण खर्च :–

१. वैयक्तिक – मर्यादित क्षेत्रासाठी , वैयक्तिक पातळीवर शुल्क हेक्टरी १५,००० ते २०,००० रुपये.

२. गट पातळीवर – १५ ते २५ किलोमीटर परिघातील १५ ते २० शेतक–यांचा गट केल्याने खर्च कमी.

३. ४० ते ६० हेक्टर क्षेत्राचे प्रमाणिकरणच सुलभ व परवडणारे

४. क्षेत्र, अंतर, प्रमाणिकरणाची कक्षा, पिके, प्रमाणिकरणाचा अपेक्षित दर्जा (मानके) यावर प्रमाणिकरण शुल्क अवलंबून

वैयक्तिक पातळीवर मोठे शेतकरी, उद्योजक, कृषिप्रकिया शेतीमाल निर्यातदारासाठी आवश्यक(प्रमाणपत्रे)–

१. सेंद्रीय शेती प्रमाणिकरण

२. प्रक्रिया उद्योग (Processing Unit) प्रमाणिकरण

३. शेतीमाल (उत्पादन) प्रमाणिकरण

## शेतकरी गट प्रमाणिकरणासाठी ICS गरजेचे :–

ICS - अंतर्गत नियंत्रण यंत्रणा (इंटरनल कंट्रोल सिस्टीम) साठी आवश्यक कागदपत्रे व नोंदी

- गटातील अधिकृत शेतक–यांची यादी, पत्ते व कोड नंबर
- गावाची यादी व गावातील शेत नकाशे
- शेताचा नकाशा
- गावाचा नकाश (गट क्रमांकसह)
- शेतकरी डायरी व अद्यावत नोंदी (प्रत्येकाच्या)
- आय.सी.एस मॅन्यूअल
- आय.सी.एस. इन्स्पेक्टर स्वाक्षरीत आय.सी.एस. अहवाल
- जमिन व पाणी तपासणी अहवाल
- जनुक परीवर्तीत पीक नसल्याबाबत ५0 % स्टॅप कागदावर लेखी हमी बॉड
- आय.सी.एस. अर्जाची सत्यप्रत

## पध्दत २ : ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया (ओफाय), गोवा

## मान्यता प्राप्त पी.जी.एस. पध्दती

## (Participatory Gurantee System / Scheme)

### ( सहभागी व स्वयंशासीत प्रमाणिकरण पध्दती)

- ब्राझीलमध्ये सन २००४ साली IFOAM (इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर मुव्हमेंट) व स्थानिक MAELA संस्थेत पी.जी.एस. वर सर्वप्रथम चर्चा व बैठक झाली.
- पी.जी.एस. पध्दतीचा वापर ब्राझील, न्यूझिलंड, अमेरिकेतील शेतक-यांत लोकप्रिय झाल्यानंतर भारतात ३ सप्टेंबर २००६ रोजी बैठक घेण्यात आली.
- बैठकीत कृषि मंत्रालय, नियोजन आयोग, अन्न व कृषि संघटना (FAO), ओफाय व इतर प्रतिनिधींनी भाग घेतला व पी.जी.एस. अवलंबायचा निर्णय झाला.
- सध्या पी.जी.एस. प्रमाणित सेंद्रीय शेतीमाल संपूर्ण भारतात कुठेही तसेच न्यूझिलंड, ब्राझील, यु.एस. ए. (काही प्रभाग) व यु.के. (काही प्रभाग) व गल्फ देशात विकता येतो.

## पी.जी.एस. ऑरगॅनिक इंडिया कॉन्सील मान्यता प्राप्त संस्था (३० एप्रिल २०११ पर्यंत)

| अ.क्र. | प्रमुख संस्था | राज्य / स्थानिक संस्था |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र ऑरगॅनिक फार्मिंग फेडरेशन, पुणे (MOFF) | महाराष्ट्र |
| २ | ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया, गोवा (OFAI) | उत्तरप्रदेश (KVK), केरळ (INFACT), पश्चिम बंगाल (DISHA), कर्नाटक (VINOD) |
| ३ | कीस्टोन फाउंडेशन, तामीळनाडू (KF) | तामीळनाडू |
| ४ | कव्हेनंट सेंटर फॉर डेव्हेलपमेंट, मदुराई (CCD) | ओरिसा, तामीळनाडू, अंदमान निकोबार, महाराष्ट्र |
| ५ | ग्रीन फाउंडेशन, बेंगलोर (GF) | तामीळनाडू, कर्नाटक |
| ६ | इन्स्टीट्यूट ऑफ इंटेग्रेटेड रुरल डेव्हलपमेंट, औरंगाबाद (IIRD) | महाराष्ट्र (IIRD), पश्चिम बंगाल (SEVA), तामीळनाडू (PAF), कर्नाटक |
| ७ | टिंबकटू कलेक्टीव्ह, चित्तूर (TC ) | आंध्रप्रदेश |
| ८ | चेतना विकास, वर्धा | महाराष्ट्र |
| ९ | ग्रास रुट्स (PHGDF) | उत्तराखंड |
| १० | डेक्कन डेव्हेलपमेंट सोसायटी, हैद्राबाद (DDS) | आंध्रप्रदेश |

पी.जी.एस. शेतकरी गटांची संख्या – ४११

एकूण शेतकरी संख्या – ४,६९७

# सहभागी व स्वयंशासित प्रमाणिकरण पध्दती (पी.जी.एस.)

## (Participatory Gurantee System)

### वैशिष्टये :

